कब्जा पावती

CHMO-ICIG-१५५

०७ CHMO-ICIG-१५५ (1)

वाटपपत्र)

सिडको
शहरांचे शिल्पकार

# शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित


नोंदणीकृत कार्यालय :
'निर्मल' दुसरा मजला, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : (स्वागत कक्ष) ००-९१-२२-६६५० ०९००
००-९१-२२-६६५० ०९२८
फॅक्स : ००-९१-२२-२२०२ २५०९/६६५० ०९३३

मुख्य कार्यालय :
'सिडको' भवन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.
दूरध्वनी : ००-९१-२२-६७९१ ८१००
फॅक्स : ००-९१-२२-६७९१ ८१६६



CIN-U99999 MH 1970 SGC-014574


दिनांक २७/०७/२०१५

क्र.सिडको/आंवित/पुनःस्थापना/२०१५/२५४५

प्रति,

श्री./श्रीमती. अशोक दत्तात्रय भोपी ,निखील अशोक भोपी
राहणार चिंचपाडा-वडघर ,
ता.पनवेल, जि.रायगड .

## वाटपपत्र

विषयः— प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधील संपादित करण्यांत येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरीत होणाऱ्या निवासी/वाणिज्यक/मिश्र वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी भूखंडाचे वाटप करणेबाबत.

संदर्भः— १) शासन निर्णय नगर विकास विभाग क.सीआयडी—१८१२/प्र.क.२७४/नवि—१०, दिनांक १ मार्च, २०१४

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क. एलक्युएन—०५/२०१४/ प्र.क. ३९—अ—२ दिनांक १६ जून २०१४

३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क.आरपीए २०१४ /प्र.क.५२/र—३ दिनांक २५ जून, २०१४

४) सिडकोचे परिपत्रक क.सिडको/व्य.सं./आवित/२०१४ दिनांक १९ सप्टेंबर २०१४

महोदय/महोदया,

१. उपरोक्त शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.सीआयडी —१८१२/प्र.क्र.२७४/नवि—१०, दिनांक १ मार्च, २०१४ अन्वये प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी आवश्यक असलेल्या मौजे वडघर(चिंचपाडा), ता.पनवेल, जि.रायगड येथील गावठाणामधील पुढे नमूद केलेल्या आपल्या जमिनीच्या संपादनाचा संमती निवाडा (Consent Award) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१ पनवेल यांनी आपण दिलेल्या


Scanned by CamScanner

७. सदर भूखंडाचा वापर आपण केवळ निवासी या प्रयोजनासाठी करावा. या व्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर केल्यास तो अटी व शर्तीचा भंग समजण्यात येईल व त्याबद्दल योग्य त्या कार्यवाहीस आपण पात्र ठराल.

८. सदर भूखंडास अनुज्ञेयतेनुसार चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध राहील. स्थलांतरीत होणाऱ्या बांधकामाचा वापर जर उपरोक्त कोष्टकामध्ये "निवासी व वाणिज्यक" असा मिश्र दर्शविण्यात आला असेल, तर अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकापैकी कमाल १५ % चटई क्षेत्राचा वापर वाणिज्यक प्रयोजनासाठी करण्यास अनुमती राहील.

९. सदर वाटपपत्रातील आणि सिडकोबरोबर करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील तसेच भाडेपट्टा खतातील सर्व अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे आपणावर बंधनकारक आहे.

१०. सदर वाटपपत्रामधील अटी व शर्ती आणि संदर्भाधिन शासन निर्णयामधील अटी व शर्ती, यामध्ये तफावत आढळल्यास, शासन निर्णयामधील अटी व शर्ती अंतिम समजण्यांत येतील.

११. उपरोक्त संपादीत जमिनीमध्ये असलेली बांधकामे स्वतःच्या खर्चाने निष्काषीत करुन आपण संबधीत उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) यांचेकडे सदर जमिनीचा ताबा सत्वर, विनाविवाद व शांततापूर्णरितीने दयावा.

कळावे.

आपला विश्वासू,

(अरविंद रा.जाधव)

विशेष कार्याधिकारी (भूमी)

Scanned by CamScanner

"संमतीपत्रानुसार" भूमिसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतुदीप्रमाणे जाहिर केला आहे.

२. उपरोक्त गावठाणामधील आपल्या जमिनीच्या तसेच त्यामध्ये झाडे, विहिरी वगैरे असल्यास, त्या सर्वाबद्दल एकत्रितरित्या देय होणाऱ्या नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी वडघर येथे निर्धारीत केलेल्या ठिकाणी सोडतीनुसार आपणांस देय झालेला खालील वर्णनाचा भूखंड वाटप करण्याबद्दल उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १ पनवेल यांनी निवाडयामध्ये नमूद केले आहे व त्यानुसार सदर भूखंड आपणास खालील अटी व शर्तीवर तसेच सिडकोबरोबर करावयाच्या भाडेपट्टा करारनामा (Agreement to Lease) आणि भाडेपट्टाखत (Lease Deed) यामध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून वाटप करण्यांत येत आहे.

३. उप जिल्हाधिकारी(भूसंपादन) यांनी निवाडयामध्ये नमुद केलेल्या संपादीत जमिनीचा व आपणांस सर्व मिळून एकत्रितरित्या वाटप केलेल्या भूखंडाचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| भूमी संपादन निवाडा क्र. | सर्वेक्षणानुसार बांधकाम कमांक | बांधकामाचे / संपादित जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | निवाडयानुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| CHMO-ICIG-१५९ | MO-४५ | ११२.९२ | निवासी | १३४.४८ | वडघर | १ | ३५ | ४१०.०० |

४. उपरोक्त भूखंडाचे वाटप, आपणाकडून संपादीत झालेली जमिन, त्यावरील झाडे, विहीरी वगैरेसाठी देय होणा–या एकत्रित नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी, आपण दिलेल्या लेखी संमतीनुसार 60 वर्षाच्या भाडेपट्टयाने संदर्भात नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये करण्यांत येत आहे.

५. सदर वाटप करण्यात आलेल्या भूखंडासाठी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तत्संबंधीत वापरामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांसाठी भूखंड वाटप(सुधारीत) विनियम 2015 नुसार प्रति वर्षास प्रति भूखंडास रुपया 1/–(अक्षरी रुपया एक मात्र) या दराने वार्षिक भाडेपट्टयापोटी देय होणारी रक्कम रुपये 60/–(अक्षरी रुपये साठ मात्र) हे वाटप पत्र मिळाल्यापासून 30 दिवसात निम्न स्वाक्षरीकारांच्या सिडकोभवन, तळमजला, सीबीडी–बेलापूर, नवी मुंबई 400614 येथील कार्यालयाशी, सुट्टीचे दिवस सोडून, संपर्क साधून भरणा करावी.

६. सदर भूखंडाच्या वाटपास नवी मुंबई जमिन विनियोग (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तत्संबधीत वापरामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांसाठी भूखंड वाटप) (सुधारीत) विनियम २०१५ आणि "सिडको विकास नियंत्रण नियमावली १९७५" च्या तरतूदी त्यामध्ये वेळोवेळी होणा–या सुधारणासह लागू राहतील. त्याचप्रमाणे संदर्भात नमूद केलेल्या शासन निर्णयामधील व सिडकोच्या

Scanned by CamScanner